सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय
"ए" रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७ Website- www.glcmumbai.com Email id- principal@glcmumbai.com

क्रमांक -शाविम/आस्था/२०२५/ 1140 दिनांक- ०७/०५/२०२५

## दरपत्रक सूचना

मा. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने **या महाविद्यालयामध्ये "पुढील एक वर्ष कालावधीकरीता ०६ सफाईगारांचा पुरवठा करण्यासाठी** पात्र व अनुभवी पुरवठादार / संस्था यांच्याकडून मोहोरबंद लिफाफ्यांमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकांनी सदर यंत्रणेचे वर्णन (तांत्रिक व अतांत्रिक फॉर्म) महाविद्यालय कार्यालयामधून उपलब्ध करुन घ्यावेत. याबाबतच्या अटी व शर्तीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

### अटी व शर्ती

१. दरपत्रकाचे फॉर्म भरुन शासकीय विधी महाविद्यालय, ए रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२० येथे महाविद्यालयाच्या ०२ ऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. १९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. त्यांनतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

२. मोहोरबंद लिफाफ्यांवर **"पुढील एक वर्ष कालावधीकरीता ०६ सफाईगारांचा पुरवठा करणे"** असे लिहिणे आवश्यक आहे. यामध्ये भाग-एक तांत्रिक व भाग- दोन अतांत्रिक असे दोन स्वतंत्र मोहोरबंद लिफाफे (दोन लिफाफा पध्दतीने) दरपत्रके सादर करावीत. अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. मोहोरबंद लिफाफ्यावर E-mail id तसेच भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रकाचे मोहोरबंद लिफाफे उघडतेवळी दरपत्रकधारक स्वतः किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

५. दरपत्रक सोबतच्या विहित फॉर्मसह दरपत्रक फॉर्मचे रु. १५००/- (ना-परतावा) शुल्क महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये भरावे व त्याची पावती दरपत्रकासोबत जोडावी.

६. सफाईगारांचा पुरवठा करणारी कंपनी ही सर्व तांत्रिकदृष्टया परिपुर्ण असावी.

७. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर सफाईगारांचा पुरवठा तात्काळ व स्विकृत दरपत्रकानुसार करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

८. संबंधित पुरवठादाराने सदरच्या कामाचे देयक मुद्रांक पावतीसह सादर करावे. देयक प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांत देयक अदा करण्यात येईल. त्याकरीता महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये बँकेच्या खात्याचा तपशिल सादर करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सर्व परिपुर्ण माहितीसह देयके सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

९. या महाविद्यालयाने दरपत्रक स्विकृत केल्यानंतर १५ दिवसांच्या आत रु. ८०००/- चा principal, Government Law College, Mumbai यांच्या नावे काढलेला डी. डी. सादर करावा.

१०. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

११. कोणतेही एक अथवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा, संपुर्ण प्रक्रिया पुर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार प्राचार्य व समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

१२. प्राप्त दरपत्रकांमधून पात्र पुरवठादाराची निवड संबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कामाचे पुरवठा आदेश स्विकारण्यास नकार दिला तर त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य व समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

१३. त्याचप्रमाणे दरपत्रकधारकाशी अनुबंध झाल्यानंतर त्याने आपले काम व्यवस्थितरीत्या न केल्यास सदर दरपत्रकधारकासोबतचा करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१४. किमान वेतन नियमापेक्षा कमी दरपत्रक आल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१५. दरपत्रकाचे फॉर्म शासकीय विधी महाविद्यालय, ए रोड, चर्चगेट, मुंबई च्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. १९/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत रु. १५००/- (ना-परतावा) भरल्यानंतर मिळतील.

१६. प्राप्त दरपत्रके दि. २०/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील याची सबंधितांनी नोंद घ्यावी.

AAVaidya

डॉ. अस्मिता वैद्य
प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'ए' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०.

दिनांक- ०७/०५/२०२५.